असा. क्र. १९४ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

**सोमवार, ऑक्टोबर १, २००७/आश्विन ९, शके १९२९**

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ ऑक्टोबर २००७

### आदेश

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.

क्रमांक मुद्रांक. २००७/प्र.क्र. २१७/म-१.––मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटल्याने, महाराष्ट्र शासन, याद्वारे, शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक एमटीसी. २००५/२/सी.आर. १७२/पर्यटन, दिनांक १६ डिसेंबर २००६ अन्वये व्याख्या केलेले व मान्यता दिलेले एक नवीन पर्यटन युनिट सुरू करण्याच्या संबंधात किंवा यासोबत जोडलेल्या अनुसूचीत अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेले परिमंडल अ, परिमंडल ब आणि परिमंडल क क्षेत्रातील विद्यमान पर्यटन युनिटाचा विस्तार करण्याच्या संबंधात, निष्पादित केलेल्या पहिल्या जमीन अभिहस्तांतरण संलेखावर, उक्त अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूची-एक च्या अनुच्छेद २५ च्या खंड (ख) अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क,

या अधिसूचनेच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या व ३१ ऑक्टोबर २०१६ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्या त्या क्षेत्रासमोर स्तंभ (४) मध्ये दर्शविलेल्या मर्यादेपर्यंत, पुढील शर्तीच्या अधीन कमी करीत आहे :—

**शर्त.**—ज्या संलेखावर मुद्रांक शुल्क कमी केले असेल त्या संलेखाच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीच्या आत कामे सुरू करण्यात कसूर करणारे किंवा महाराष्ट्र पर्यटन धोरण, २००६ च्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करणारे कोणतेही युनिट, जणू काही सुरुवातीपासूनच मुद्रांक शुल्क कमी केले नसल्याप्रमाणे, संपूर्ण मुद्रांक शुल्क व शास्ती कोणतीही असल्यास भरण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या आदेशाच्या प्रयोजनार्थ, नवीन पर्यटन युनिट किंवा विद्यमान पर्यटन युनिटाचा विस्तार याचा अर्थ, महाराष्ट्र पर्यटन धोरण, २००६ अन्वये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांनी असे युनिट म्हणून प्रमाणित केलेले पर्यटन युनिट, असा आहे.

| अ.क्र. | परिमंडल | क्षेत्राचे वर्णन | मुद्रांक शुल्कातील घट मर्यादा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | अ | मुंबई, मुंबई उपनगर जिल्हा, नवी मुंबई, ठाणे, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रे. | ५० टक्के |
| २ | ब | सर्व महानगरपालिका (परिमंडल अ मधील क्षेत्रांव्यतिरिक्त) आणि अ वर्ग नगरपालिका क्षेत्रे. | १०० टक्के |
| ३ | क | परिमंडल अ आणि ब यांमधील क्षेत्रांखेरीज महाराष्ट्रातील सर्व जिल्हे. | १०० टक्के |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. रा. माळी,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st October 2007

### Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. Mudrank 2007/C.R.217/M-1.—In exercise of the powers conferred by clause *(a)* of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby reduces the stamp duty chargeable under clause *(b)* of Article 25 of the Schedule I, appended to the said Act, on the instrument of first Conveyance of land executed in relation to starting of a New Tourism Unit, as defined and approved under the Government Resolution, Tourism and Cultural Affairs Department, No. MTC. 2005/2/CR-172/Tourism, dated the 16th December 2006, or in relation to expansion of the existing Tourism Unit in the Zone A, Zone B and Zone C areas more particularly described in the Schedule appended hereto, to the extent shown in column (4) against the areas respectively specified in column (3) thereof, for the period starting from the date of this notification and ending on 31st October 2016, subject to following condition namely :—

*Condition.*—Any unit failing to start the activities within the period of three years from the date of instrument for which the reduction in stamp duty in granted or commits breach of any of the conditions of the Tourisms Policy of Maharashtra 2006, shall be liable to pay the whole the stamp duty and penalty, if any, as if there was no reduction in stamp duty from the beginning.

*Explanation.*—For the purpose of this order, " New Tourism Unit " or " Expansion of the existing Tourism Unit " shall mean the Tourism Unit which is so certified to be such unit by the Maharashtra Tourism Development Corporation Limited, under the Tourism Policy of Maharashtra 2006.

*SCHEDULE*

| Sr. No. (1) | Zone (2) | Description of the Areas (3) | Extent of reduction of stamp duty (4) |
|---|---|---|---|
| 1 | A | Mumbai, Mumbai Suburban District, Navi Mumbai, Thane, Pune and Primpri-Chinchwad Municipal Corporation areas. | 50% |
| 2 | B | All Municipal Corporations (except areas in Zone A) and A Class Municipalities areas. | 100% |
| 3 | C | All district of Maharashtra except areas in Zone A and B. | 100% |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. R. MALI,
Joint Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई